सागरमाला कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या जेट्टी बांधकामांसाठी पुनर्विनियोजनाने उपलब्ध रू. १६ कोटी इतका निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीजीटी-१११७/प्र.क्र.२११/बंदरे-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३१ मार्च, २०१८

वाचा :- **१.** शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
२. शासन निर्णय, गृह विभाग क्र.बीजीटी १०१७/प्र.क्र.४७/१७/अर्थसं-१, दि.३१.०३.२०१८
३. मुख्य अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचे पत्र क्र. ममेबो/मुकाअ/अभि/पुरक मागणीचा प्रस्ताव/७६, दिनांक २१.०२.२०१८.

शासन निर्णय :-

उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये "मागणी क्र. बी-७, लेखाशीर्ष क्र. ३०५१- बंदरे व दिपगृहे, (०२) लहान बंदरे, (१९०) सार्वजनिक उपक्रम व इतर उपक्रमांना सहाय्य, (००)(०२) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास सहायक अनुदान-तरंगती जेट्टी व तत्सम प्रवाशी सुविधा उभारणे (३०५१ १८३५), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीत सन २०१७-१८ च्या सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत रू.१६ कोटी इतका निधी "मागणी क्र.७, लेखाशीर्ष क्र. ३०५१- बंदरे व दिपगृहे, ०२- लहान बंदरे, (१९०), सार्वजनिक उपक्रम व इतर उपक्रमांना सहाय्य, (००)(०३) जेट्टीच्या बांधकामाकरीता केंद्राचे सहाय्य (सागरमाला) (राज्य हिस्सा ५०%) (३०५१ १८९१), ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान" या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचा निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना खर्च करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा निधी सागरमाला कार्यक्रमांतर्गत ज्या कामांना केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे व ज्या कामांकरीता केद्राकडून केंद्र हिस्सा जमा झालेला आहे अशा कामांकरीताच खर्च करण्यात यावा.

३. सदर निधी नियमाप्रमाणे खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांची राहील.

४. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.७, लेखाशीर्ष क्र. ३०५१- बंदरे व दिपगृहे, ०२- लहान बंदरे, (१९०), सार्वजनिक उपक्रम व इतर उपक्रमांना सहाय्य, (००)(०३) जेट्टीच्या बांधकामाकरीता केंद्राचे सहाय्य (सागरमाला) (राज्य हिस्सा ५०%) (३०५१ १८९१), ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा.

५. या वितरीत करावयाच्या तरतुदीकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून लेखाधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड हे राहतील.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ ला अनुसरून प्रशासकिय विभागाला असलेल्या अधिकारान्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

७. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या दि.१८.०४.२०१७ च्या शासन परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ. क्र.८ मधील १ ते १० अटींची पूर्तता होत असल्याची तपासुन खात्री करण्यात आली आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०३३११६२९२५३०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok
Hanmanlu
Damayyawar

Digitally signed by Ashok Hanmanlu Damayyawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2bd0dc6138e4f3c9997616b47f0dc918cd4715f466afd0623c843397ffc06a09, serialNumber=2cc45c1c1345a8b6ff1e9fdbd2d12c6527f6d070c05b708bcc57b79b7ef3a95d, cn=Ashok Hanmanlu Damayyawar
Date: 2018.04.02 12:25:08 +05'30'

(अ. ह. दमय्यावार)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) वित्त विभाग (व्यय-८/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई-३२.
५) नियोजन विभाग (का. १४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
६) प्रधान सचिव (बंदरे), गृह विभाग.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई
८) अवर सचिव, बीयुडी-१, गृह विभाग.
९) निवडनस्ती (बंदरे-२).